# सयाजीराव गायकवाड यांची स्त्री न्यायाची संकल्पना

डॉ. धर्मवीर शाहू क्षीरसागर, ए.सी.एस. कॉलेज, गडहिंग्लज, 9970975264

---

**गोषवारा:**

भारतात स्वीकारले जाणारे कोणतेही परिवर्तनाचे प्रारूप हे भारताच्या स्वाभाविकपणावर आधारित असावे, असा सयाजीरावांचा विचार होता .प्रत्येकाला स्वतःच्या परंपरेनुसार व उत्क्रांतीच्या मार्गानुसार स्वतःची प्रगती करून घेण्याची मोकळीक असणारे विकासाचे, परिवर्तनाचे व न्यायाचे प्रारूप सयाजीरावांना मान्य होते. सयाजीरावांच्या मतानुसार प्राचीन भारतात स्त्री वर्गाला स्वातंत्र्य आणि सन्मान होता, अर्थात न्याय वागणूक होती. कालांतराने स्त्रीला अन्याय वागणूक मिळत गेली, बंधने वाढली. त्यांना विविध स्वातंत्र्यापासून वंचित ठेवण्यात आले. स्त्रियांना न्याय देण्यासाठी बदललेल्या काळानुरूप प्राचीन न्याय प्रारूपाला पूनर्प्रस्थापित करता येईल, असा विचार सयाजीरावांनी मांडला. मुलींना व प्रौढ महिलांना शिक्षणाचा अधिकार व लाभ मिळावा यासाठी शिक्षण प्रसारावर भर देण्याचे धोरण स्वीकारले. स्त्रियांना शिक्षणाची दारे खुली पाहिजेत याचे समर्थन करताना सयाजीरावांनी स्त्रियांना भारतीय समाज व्यवस्थेनुरूप शिक्षण दिले जावे, अशी भूमिका मांडली. स्त्री शिक्षणातील अभ्यासक्रम हा देशकाल परिस्थितीस अनुसरून असावा. स्त्रीविषयक सामाजिक न्यायाबाबत सयाजीराव गायकवाड यांनी भारतीय कुटुंब व्यवस्था, समाज व्यवस्था, स्त्री पुरुष संबंध आणि-स्त्रियांना संधी या सर्व गोष्टींचा मेळ घातला.

**संशोधन पद्धती:**

प्रस्तुत संशोधनात ऐतिहासिक व विश्लेषणात्मक पद्धतीचा अवलंब केला असून सयाजीराव गायकवाड यांची स्त्री न्यायाची संकल्पना समजून घेणे व त्यांनी स्त्री न्यायासाठी केलेल्या प्रयत्नावर प्रकाश टाकणे, हे प्रस्तुत शोध निबंधाचे उद्देश आहेत. प्राचीन भारतात स्त्री वर्गाला स्वातंत्र्य आणि सन्मान होता कालांतराने तो नष्ट झाला, अशी सयाजीरावांची धारणा होती. स्त्री स्वभाव व भारतीय कुटुंब प्रणाली विचारात घेऊन स्त्रियांच्या न्यायाची तरतूद केली पाहिजे, अशी सयाजीराव गायकवाड यांची संकल्पना होती. या गृहितकावर प्रस्तुत शोध निबंध आधारित आहे. तथ्य संकलनासाठी द्वितीय माहिती स्त्रोतातर्गत संदर्भ ग्रंथांचा आधार घेतला आहे. ज्यामध्ये चरित्र, भाषणसंग्रह, पत्रसंग्रह व आदेशांचा समावेश केला आहे.

**विषय विवेचन:**

सयाजीरावांच्या मतानुसार प्राचीन हिंदुस्थानात स्त्री वर्गाला स्वातंत्र्य आणि सन्मान होता. स्त्रियांना बरेच स्वातंत्र्य होते. त्यांना ललितकलांचे व सुसंस्कृत विचाराचे शिक्षण दिले जात असे. पुढे राम व सीता यांच्या आदर्शवादी कथेमध्ये सीता ही रामाची साह्यचारीणी यापेक्षा पतिव्रता या नात्यानेअधिक महत्त्वाची वाटू लागली. पुढे परकीयांची आक्रमणे व अज्ञान यामुळे स्त्रीविषयक कल्पनांमध्ये 'स्त्रीने पतीसेवेत तत्पर राहावे' ही कल्पना अधिक प्रबळ झाली. त्यातून पुढे स्त्री अन्यायकारक सती जाणे, विधवा विवाह प्रतिषेध, बालविवाह या चाली रूढ झाल्या. यातच मुसलमानांपासून आलेली पडदा पद्धत प्रचलित झाली. अशाप्रकारे सयाजीरावांनी प्राचीन काळी स्त्रीला स्वातंत्र्य सन्मान अर्थात न्याय वागणूक होती. कालांतराने स्त्रीला अन्याय वागणूक मिळत गेली. तिच्या वरील बंधने वाढली. तिला विविध स्वातंत्र्यापासून वंचित ठेवण्यात आले. स्त्रियांना न्याय देण्यासाठी प्राचीन न्याय प्रारूपाला बदललेल्या काळानुरूप पूनर्प्रस्थापित करता येईल. असा विचार सयाजीरावांनी मांडला आहे. (वरखेडे, 2017, भाग 1, खंड 1 : 32-134).

सयाजीराव गायकवाड यांनी 26 फेब्रुवारी 1934 रोजी स्टुडंट्स लिटररी अँड सायंटिफिक सोसायटी मुंबई येथील मुलींच्या शाळेच्या सुवर्ण महोत्सवात दिलेल्या भाषणात आपले मत मांडले आहे. स्त्रियांना प्राचीन भारतात न्याय स्थान होते; त्यांना पुरुषाबरोबर समान दर्जा होता, हे संस्कृत वचनांचा दाखला देऊन सयाजीरावांनी स्पष्ट केले आहे. 'त्वमेव माता पिता त्वमेव' हे संस्कृत वचन परमेश्वराच्या उभयलिंगी अवस्थे विषयी सांगते. यामध्ये ईश्वराच्या अर्धनारीनटेश्वर स्वरूपाचे वर्णन करून स्त्री पुरुष समानतेचे समर्थन केले आहे, असे सयाजीराव गायकवाड यांचे म्हणणे आहे. सद्य परिस्थितीत (सयाजीरावांच्या कालखंडात) स्त्रियांना आपल्या गुणांचा पूर्ण विकास करण्यासाठी संधी दिली पाहिजे. चूल आणि मूल याबंधनातून स्त्रीला बाहेर काढले पाहिजे. स्त्रीचे जीवन केवळ चूल, मूल आणि देऊळ एवढेच न राहता त्यांनी शिक्षण घेऊन पुढे आले पाहिजे, मात्र शिक्षित, विद्वान होऊन बेबंद वागणारी स्त्री सयाजीरावांना अपेक्षित नाही, याशिवाय केवळ परंपरेच्या आणि संस्काराच्या ओझ्याखाली दबलेली स्त्रीही त्यांना नको आहे. ईश्वराने किंवा निसर्गानेच स्त्री-पुरुषात भेद केला आहे हे गृहीतक अमान्य केले आहे. निसर्ग, शास्त्रे व व्यवहार यांच्या शिकवणीनुसार स्त्रीला पोषक व संवर्धक परिस्थिती निर्माण करून दिली पाहिजे, असा सयाजीरावने स्त्रीविषयक न्यायाविषयी विचार मांडला आहे. स्त्रियांनी भाषा, संगीत, कला, कौशल्य,

गृहशास्त्र या विषयांवर लक्ष केंद्रित करावे. घर व शिक्षण यांचा सुंदर संगम स्त्रीच्या स्वाभाविक कार्यामध्ये होऊ शकतो, असे सयाजीरावांचे म्हणणे आहे. (वरखेडे, 2017, भाग 2, खंड 2: 299-302). "पूर्वीच्या काळी आपल्या घरातील स्त्रिया पुरुषाइतक्याच चांगल्या शिकलेल्या असत. समाजकार्य आणि वेदांतविषयक चर्चा यातही महत्त्वाचा भाग घेण्याइतके शिक्षण पूर्वी स्त्रियांना दिले जाई…स्त्री स्वातंत्र्याविषयी हल्ली आपण पुष्कळ ऐकतो; पण स्वातंत्र्याचे रूपांतर स्वैरतेच्या परवान्यात होणार नाही, याची खात्री आपण दिली पाहिजे" (वरखेडे, 2017, भाग 2, खंड 2 : 335-336).

हिंदू धर्मातील प्राचीन धार्मिक तत्त्वज्ञानाला न्याय अर्थ होता; पुढील काळात चुकीचा अर्थ काढला गेला. असे सयाजीराव गायकवाड यांचे म्हणणे आहे. उदाहरण म्हणून त्यांनी बाळंतपणाच्या काळात स्त्रियांना स्पर्श करू नये, हे धार्मिक तत्व स्त्री न्यायाचे होते असे म्हटले आहे. बाळंतपणात सुईनींच्या चुकीच्या हाताळण्यामुळे अनेक स्त्रियांना आपले जीव गमवावे लागतात. (पुढे सयाजीरावांनी प्रशिक्षित सुईणींबाबत कायदा केला.) खरे तर मुळ धर्मआज्ञेप्रमाणे बाळंतपणात स्त्रीच्या जवळ इतरांनी जाऊ नये, त्यामुळे स्त्रीला जंतुसंसर्ग होण्याची शक्यता असते, स्त्रीला नैसर्गिकरीत्या बाळंत होऊ द्यावे. या धर्माआज्ञेचा आपण विपर्यास करून असा अर्थ काढला की, बाळंतपणाच्या काळात त्या स्त्रीमुळे इतरांना जंतुसंसर्ग होतो व आपण स्त्रीलाच अडचणीच्या काळातही वेगळे ठेवू लागलो. स्त्रीला नैसर्गिकरीत्या बाळंत होऊ देण्यातच स्त्रीचे हित आहे. हे धार्मिक न्यायाचे तत्व अस्तित्वात होते, असे सयाजीराव म्हणतात. यावरून सयाजीरावांची हिंदू धर्माच्या प्राचीन तत्त्वज्ञानाकडे पाहण्याची दृष्टी लक्षात येते. प्राचीन वैदिक धर्मामध्ये अनेक सामाजिक न्यायाच्या गोष्टी सांगितलेल्या आहेत. परंतु काळानुरूप त्याचा विपर्यास करून अन्याय धर्म कल्पना रूढ झाल्या. असे सयाजीरावांच्या म्हणणे आहे. "आपल्या धर्माच्या इतर अर्थगर्भ आज्ञाप्रमाणे या आज्ञेतीलही (स्त्रीचे बाळंतपण) खऱ्या अर्थाचा लोप होऊन भलताच अर्थ रूढ होऊन बसला…. धर्म नियमातील तत्त्व कोणते, शब्दावडंबर कोणते, हे ओळखण्याची शक्ती आमच्यात उरली नाही. धर्मपरायणता म्हणून ज्या गोष्टीला आपले, कर्मट लोक डोक्यावर घेऊन नाचतात ती गोष्ट पुष्कळदा इतकी दयामायाविरहित असते की, दयेवर आधारलेल्या खऱ्या हिंदू धर्माची ती विटंबनाच आहे असे वाटते….. आपल्या संस्कृतीतील इष्ट तेवढे डोळसपणाने आपण स्वीकारले पाहिजे व अनिष्ट तेवढे टाकून दिले पाहिजे…. आधुनिक शास्त्रीय प्रगती ही कोणत्याही प्रकारे हिंदू धर्मज्ञांच्या प्राचीन शुद्धतेला बाधा आणणारी नाही" (वरखेडे, 2017, भाग 1, खंड 1, 336-337).

मुलींना व प्रौढ महिलांना शिक्षणाचा अधिकार व लाभ मिळावा यासाठी शिक्षण प्रसारावर भर देण्याचे धोरण स्वीकारले. सन 1875 ते सन 1909 या 34 वर्षात मुलींच्या शाळांची संख्या 167 पटीने व मुलींची संख्या 1100 पटीने वाढली. या काळातील 334 शाळांपैकी पाच शाळा अंत्यजांसाठी काढल्या. प्रौढ विद्यार्थिनींसाठी 'स्त्री शिक्षण पद्धती पाठशाळा' स्थापन केली सर्व स्त्रियांना मोफत शिक्षण देण्याची सोय केली. (मालकर, मगर, 2018: 112-113). स्त्री शिक्षकांचा प्रश्न सोडवण्यासाठी ‘ट्रेनिंग कॉलेज फॉर वुमेन’ ची स्थापना सन 1882 साली करण्यात आली. सन 1893 मध्ये महिला अध्यापन शाळा सुरू केली. प्रारंभी केवळ विधवा स्त्रिया भविष्यात रोजगार मिळेल यासाठी या ट्रेनिंग स्कूलमध्ये दाखल होत. पुढे न्हावी, कुंभार, अंत्यज या मागासलेल्या जातीतील स्त्रिया शिक्षण संस्थेत प्रवेशीत झाल्या. इमारतीसाठी तीन लाख 92 हजार 30 रुपये खर्च करण्यात आला. या स्कूलमध्ये शिकणाऱ्यांसाठी वस्तीगृह स्थापन करण्यात आले सन 1904-05 झाली दरमहा दोनशे रुपये शिष्यवृत्ती सोय केली. वस्तीगृहात राहणे, जेवणाची सोय करण्यात आली. काळानुसार शिक्षण वर्ग, अभ्यासक्रम, वेळापत्रक यात सुधारणा केल्या. अभ्यासक्रमात ‘किंडर गार्डन मेथड’ बाल शिक्षण पद्धती, गृहजीवनशास्त्र, भरतकाम, चित्रकला, विणकाम, शिवणकाम, गायन वादन, स्वयंपाक हे विषय ठेवण्यात आले. प्रशिक्षित शिक्षक हा शैक्षणिक प्रक्रियेत ज्योतिरावांनी महत्त्वाचा मानला होता. (भांड, 2017: 88-89). गृहविज्ञान विषय शिकवण्यासाठी सयाजीरावांनी न्युझीलँडच्या ‘मिस स्ट्रॉंग’ या प्रशिक्षित महिला शिक्षिकेला महाविद्यालयात नेमले होते. हा आपल्या देशातील असा पहिला प्रयोग होता. (भांड, 2017: 182). हिंदू कायद्याने स्त्रियांचा दर्जा व संकुचित हक्क शिवाय विवाह विषयक जाचक बंधन याविषयी महाराजांनी सुधारणा विषयक प्रयत्न केले. स्त्रियांच्या सर्वांगीण उन्नतीचा पाया म्हणजेच स्त्री शिक्षण समजून त्यांना सक्तीचे मोफत शिक्षण दिले. (भांड, 2017: 150). स्त्रियांना शिक्षणाची दारे खुली पाहिजेत याचे समर्थन करताना सयाजीरावांनी स्त्रियांना भारतीय समाज व्यवस्थेनुरूप शिक्षण दिले जावे, अशी भूमिका मांडली. "बायकांना शिक्षण दिले पाहिजे. याबद्दल आता कुठेही मतभेद आढळणार नाही. ते शिक्षण म्हणजे नुसत्या परीक्षा पास होणे नव्हे. बायकांना संसारविषयक शिक्षण मिळाले पाहिजे. त्यांना आपली मुले कशी वाढवायची याचे ज्ञान मिळाले पाहिजे. आपल्या पतीस वाईट गोष्टींपासून कसे परावृत करावयाचे, हेही बायकास शिकवले पाहिजे...बायकास रसायनशास्त्र वगैरे शास्त्रांचे शिक्षणही देणे जरूर आहे." (वरखडे, 2017, भाग 1, खंड 1 : 226).

मुंबई विद्यापीठाच्या अभ्यासक्रम मुलांच्या गरजा व मनोभूमिका लक्षात घेऊन तयार केला होता व स्त्रियांच्या मनोभूमिका व गरजांचा विचार त्यात केलेला नव्हता. अशा अ-स्वाभाविक अभ्यासक्रमात स्त्रियांसाठी ललित विषयांचाही समावेश असावा, मातृभाषेतून शिक्षण असावे म्हणून पुणे येथे 'महाराणी चिमणाबाई महिला पाठशाळा' स्थापन झाली. यामध्ये गृहजीवनशास्त्र, शिशुमानसशास्त्र, समाजशास्त्र अशा गृहपयोगी व समाज उपयोगी अभ्यासक्रमास प्राधान्य दिले होते. (भांड, 2017 : 85). स्त्री शिक्षणातील अभ्यासक्रम हा देशकाल परिस्थितीस अनुसरून असावा. अशी देशीवादी भूमिका सयाजीरावांनी घेतली. गृह प्रपंच चालवणे, मुलांचा शारीरिक भौतिक नैतिक विकास करणे, पतीस वाईट गोष्टी पासून परावृत करणे, असा कुटुंबाचा भक्कम पाया तयार करणारा अभ्यासक्रम रचण्यावर त्यांनी भर दिला. (वरखडे, 2017, भाग 1, खंड 1 : 69). पडदाशीन महिलांसाठी हा ‘झनानावर्ग’ सुरू केले ज्या स्त्रिया पडदाशीन आहेत व ज्यांना शिक्षण घेण्याची इच्छा आहे त्यांना लिहिणे, वाचणे, हिशोब ठेवणे गृहपयोगी शिक्षण देण्याची सोय केली. सन 1895 साली असे आठ वर्ग होते. सन 1929-30 साली बडोद्याला 55, ‘कठोर’ व ‘पेटलाद’ येथे अनुक्रमे 52 व 48 स्त्रिया शिक्षण घेत होत्या. (भांड, 2017: 85).

घरगुती स्त्रियांना उद्योग क्षेत्रात कार्य करता यावे. त्यांच्या औद्योगिक क्षमता विकासाला बळ देण्यासाठी चिमणाबाई ‘स्त्री उद्योगालय’ सुरू करून शिवणकाम, भरतकाम प्रशिक्षण वर्ग सुरू केले. याचा फायदा अनेक स्त्रियांना झाला. (भांड, 2017 : 86). सयाजीरावांनी स्त्री शिक्षणाचा आग्रह धरला. इंग्रजी बरोबर मातृभाषेतून शिक्षण मिळाले पाहिजे, असा विचार मांडला. सामान्य विषयांबरोबर गृहउपयोगी शिक्षणाचा प्रयत्न केला. कुटुंब संस्थेला अधिक बळकटी देईल, अशा विषयांवर भर दिला. अस्पृश्य व पडदासीन या वंचित वर्गातील स्त्रियांच्या शिक्षणाची सोय केली. ‘स्त्री शिक्षक ट्रेनिंग शाळा’ सुरू करून, ज्योतिराव फुले यांना अपेक्षित असणारा प्रशिक्षित शिक्षक तयार करण्याची सोय केली. चिमणाबाई महिला पाठशाळा सुरू करून कुटुंबाभिमुख, स्त्रीस्वाभाविक शिक्षणाचा प्रयोग केला. ज्याला जे हवे त्याला स्वभाविकतेनुसार, सामाजिक गरजेनुसार (कुटुंब) रचनेनुसार, शिक्षण प्रक्रिया राबवण्याचा प्रयोग सयाजीराच्या सामाजिक न्याय संकल्पनेचा विशेष आहे.

सयाजीरावांनी नोकरवर्ग संबंधाने केलेल्या एका हुकूमात स्त्रियांच्या बाबतीत पुढील नियम दिले होते. स्त्रियांना नोकरीत घेण्यास हरकत नाही. कारकुन दर्जाच्या नोकरीसाठी स्त्री उमेदवाराच्या अर्जावर सयाजीरावांची मंजुरी घ्यावी. पोलीस पदासारख्या ठिकाणी स्त्रियांकडून नोकरी होणार नसेल तर तिथे त्यांची नेमणूक करु नये. कामाच्या ठिकाणी स्त्रियांचे कपडे साधे असावेत, भक्केदार नसावेत. केवळ स्त्री आहे म्हणून स्त्री नोकराकडून काम करून घेण्यास कुचराई करू नये. स्त्री डॉक्टर नेमल्यास डॉक्टरांची सर्व कर्तव्य पार पाडावीत. केवळ स्त्री रुग्णांविषयी कार्य करू नये. अशाप्रकारे स्त्री-पुरुषांच्या समतेचा पुरस्कार करताना स्त्रियांना संधी मिळाली पाहिजे, परंतु स्त्री स्वभाव व कामाचे स्वरूप यांचा ताळमेळ साधला पाहिजे. पुरुषाच्या बरोबरीने कर्तव्य निभावणे व कर्तव्य करून घेण्यामध्ये स्त्री-पुरुषात भेद केला जाऊ नये. भारतीय कुटुंब व्यवस्था, समाज व्यवस्था, स्त्री-पुरुष संबंध आणि स्त्रियांना संधी या सर्व गोष्टींचा मेळ स्त्रीविषयक सामाजिक न्यायाचा विचार सयाजीराव यांनी घातलेला दिसतो. (भांड, 2017 : 625).

स्त्रियांना कलाचे शिक्षण दिले तर त्यांचे आर्थिक सामर्थ्य वाढेल. विशेषतः विधवा स्त्रियांना घरगुती व्यवसाय काढता येईल. अर्थात उद्योग व्यवसायाचे शिक्षण स्त्रियांना दिले गेले तर विधवा स्त्रियांच्या न्यायाचा प्रश्न सोडवता येईल, असा विचार सयाजीरावांनी केला आहे. (वरखेडे, 2017, भाग 1, खंड 1 : 84). दिनांक 12 सप्टेंबर 1912 रोजी लेडी हार्डिंज यांना दिल्ली येथे महिलांसाठी एक मेडिकल कॉलेज हॉस्पिटल सुरू करण्याचा आपला विचार सयाजीरावांनी कळवला होता. (पगार, 2017: 249). स्त्री न्यायासाठी स्त्रियांचे कर्तव्य कोणते? हे सांगताना सयाजीरावांनी दोन मुद्दे स्पष्ट केले आहेत. एक, परिश्रम घेऊन स्त्रियांनी शिक्षण पूर्ण करावे. आपल्याला मिळालेले ज्ञान इतरांना देण्याचे कार्य करावे. दोन, आपल्या शुद्ध व पवित्र आचरणाने स्त्रीशिक्षणाच्या विरोधकांचे मत निराधार असल्याचे सिद्ध करावे. यामध्ये सयाजीरावांनी शिक्षित स्त्रियांनी आचरणामध्ये शुद्धता व पावित्र्य राखले तर स्त्रियांबद्दल पूर्वग्रह दूषित पुरुषी मानसिकतेत बदल होऊ शकतो. असा विश्वास व्यक्त केला आहे. (वरखेडे, 2017, भाग 1, खंड 1 : 112). स्त्रियांना शिक्षण दिले जावे परंतु ते पाश्चात्य शिक्षणाचे पूर्ण अनुकरण असू नये तर स्त्री स्वभाव आणि भारतीय सामाजिक कौटुंबिक प्रारूपाला अनुरूप अशा प्रकारचे शिक्षण स्त्रियांना दिले जावे अशी सयाजीरावंची स्त्री न्याय विषयक भूमिका होती. स्त्री पुरुषांच्या श्रमविभागणीचे भारतीय कुटुंब अनुरूप प्रारूप सयाजीराव गायकवाड यांना न्याय वाटते ज्यामध्ये पुरुष कुटुंबाच्या निर्वाहाची जबाबदारी उचलतो तर स्त्री गृहप्रपंच व मुलांचा सांभाळ आजारांची सुश्रुषा ही जबाबदारी उचलते, असे असले तरी स्त्रियांचा कुटुंबामध्ये दर्जा आणि मान योग्य पद्धतीने राहिला पाहिजे, अशी सयाजीरावांची भूमिका होती ते म्हणतात की, "अनुकरण करावयाचे ते गुलामी वृत्तीने करू नये आणि आपल्या एकंदर वृत्तीला अस्वाभाविक असलेल्या गोष्टी मारून-मुटकून व तिच्यात कोंबू नयेत. कारण,

जी राहणी व विचारसरणी दुसऱ्यापासून नव्यानेच आपण घेऊ म्हणतो ती आपल्या परिस्थितीला व पर्यायाने आपल्या अनुवंशिक परंपरेला अनुरूप असली तर बरं. नाहीतर भलतेच परिणाम ओढावतात. ते टाळावयाचे असतील तर परंपरेवर परिस्थितीवर जोर जुलून करून भागणार नाही....आपल्या जुन्या पद्धतीप्रमाणे एक पाकनिष्पत्तीचे काम सोडून घरातील बाकीच्या सर्व कामांची जबाबदारी घरच्या यजमान पुरुषावर असे आणि कुटुंबाच्या निर्वाह साधनांची तरतूद करण्याचे जे वास्तविक त्या पुरुषाचे काम ते सांभाळून त्याच्याशिवाय त्याला ही घरातील जबाबदारी देखील शिरावर घ्यावी लागत असे. गृहप्रपंच चालविण्याचे काम आणि त्याच्या जोडीला मुलांच्या शारीरिक, बौद्धिक व नैतिक भरणपोषणांचे काम आजार्यांची सुश्रुषा करण्याचे काम ही कामे घरातल्या यजमानीने आपल्या शिरावर घेतली, तर त्यात कुटुंबाचा आर्थिक दृष्ट्या मोठा फायदा होण्यासारखा असतो. कारण ही कामे पार पाडण्याची पात्रता स्वभावत:च आणि फक्त तिच्यामध्येच असते. पती आणि पत्नी यांच्या कर्तव्यातला हा महत्त्वाचा फरक लक्षात ठेवून तदनुसार वर्तन ठेविले, तर कुटुंबातील व्यवहार स्वाभाविक अशा श्रम विभागाच्या तत्त्वावर चालू लागतील आणि एकंदर गृहकृत्यांपैकी जो वाटा उचलण्याची नैसर्गिक पात्रता त्या भागीदारात उत्कृष्टपणे असते, तो वाटा भागीदार आपल्याकडे घेऊन पार पाडू लागेल. अशी निसर्गानुकुल श्रम विभागणी जोपर्यंत संसारात होत नाही, तोपर्यंत स्त्रिया या घाबरट व लाजाळच राहणार आणि त्यांची नैसर्गिक वाढही खुरटणार" (वरखेडे, 2017, भाग 2, खंड 2 : 263-264).

भारतात स्वीकारले जाणारे कोणतेही परिवर्तनाचे प्रारूप हे भारताच्या स्वाभाविकपणावर आधारित असावे, असा सयाजीरावांचा विचार होता. प्रत्येकाला स्वतःच्या परंपरेनुसार व उत्क्रांतीच्या मार्गानुसार स्वतःची प्रगती करून घेण्याची मोकळीक असणारे विकासाचे परिवर्तनाचे व न्यायाचे प्रारूप सयाजीरावांना मान्य होते. 12 नोव्हेंबर 1932 रोजी बडोदे या ठिकाणी दिलेले का भाषणात त्यांनी आपला विचार पुढील प्रमाणे मांडला आहे, ते म्हणतात की "आम्हा सर्वांना स्वतःचा विकास स्वाभाविकपणेच झालेला हवा आहे. प्रत्येकाला स्वतःच्या परंपरेनुसार व उत्क्रांतीच्या स्वतःच्या मार्गानुसार स्वतःची प्रगती करून घेण्याची मोकळीक हवी आहे. उपमेच्या भाषेत सांगावयाचे तर मनुष्याने वाकवून-वळवून चित्रविचित्र आकार दिलेल्या झाडांप्रमाणे आम्हाला वाढावयाचे नसून अरण्यातील वृक्षराजांचे स्वाभाविक विकसन आम्हाला पाहिजे आहे. माझ्या राज्यात सुधारणा वगैरे जे काही मी केले आहे ते सर्व हेच स्वाभाविक विकासाचे ध्येय पुढे ठेवून मी केलेले आहे." (वरखेडे, 2017, भाग 2, खंड 2 : 191).

**निष्कर्ष:**

प्राचीन वैदिक धर्म समानता, स्वातंत्र्य, न्यायावर आधारित असल्याचे मान्य सयाजीरावानी मान्य केले आहे. पाश्चात्य वैज्ञानिक ज्ञान भारतीय परिस्थितीनुरूप स्वीकारणे आवश्यक आहे असा विचार मांडला. स्त्रियांना समान व गृहपयोगी शिक्षण दिले जावे असे त्यांचे मत होते. तसेच त्यांनी स्त्रियांच्या स्वभावगुणानुसार शिक्षणाचा पुरस्कार केला. धर्मग्रंथ रूढी, प्रथा, परंपरा यांनी सांगितलेल्या तत्त्वज्ञानाची चिकित्सा केली पाहिजे व काळानुरूप अन्याय बाबी दूर करून सामाजिक न्यायासाठी आवश्यक बदल केले पाहिजेत, असा सयाजीरावांचा विश्वास होता. धर्म सुधारण्यामुळे जनतेचा रोष उडून घेतला जातो कारण समाजातील ज्या लोकांचा उदरनिर्वाह अंधश्रद्धा आणि अनिष्ट बाबी यावर चालतो त्यांचा धर्म सुधारणेला विरोध होतो हे ओळखून महाराजांनी याबाबत लोकमत अनुकूल करण्यावर भर देऊन काही कालखंडानंतर सुधारणा केल्या. धर्मातील सुधारणा केवळ बळाच्या आणि कायद्याच्या जोरावर शक्य नसून त्यासाठी जनमत अनुकूल करण्यावर महाराजांनी भर दिला.

**संदर्भसूची:**

1. मालकर, यमाजी. मगर, राजेंद्र (संपा.). (2018). *महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्रसंग्रह* (भाग १). मुंबई, भारत. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ.

2. भांड, बाबा (संपा.). (2017). *महाराजा सयाजीराव गौरव गाथा युगपुरुषाची* (खंड. 12). औरंगाबाद, भारत. महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्र साधने प्रकाशन समिती.

3. वरखेडे, रमेश (संपा.). (2017). *महाराजा सयाजीराव गायकवाड यांचा भाषण संग्रह* (भाग. 1, खंड. 1). औरंगाबाद, भारत. महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्र साधने प्रकाशन समिती.

4. वरखेडे, रमेश (संपा.). (2017). *महाराजा सयाजीराव गायकवाड यांचा भाषण संग्रह* (भाग. 2, खंड. 2). औरंगाबाद, भारत. महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्र साधने प्रकाशन समिती.

5. पगार एकनाथ (संपा.). (2017). *महाराजा सयाजीराव गायकवाड यांचा पत्र संग्रह* (भाग. 2, खंड. 4). औरंगाबाद, भारत. महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्र साधने प्रकाशन समिती.